# मुघल व मुघालोत्तर काळातील संगीत कलेचा प्रवास

**प्रा. उमाकांत आण्णाप्पा हत्तीकट**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. मंजुश्री घोरपडे**
इतिहास विभाग प्रमुख
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त)

**सारांश :-**

प्रस्तुत संशोधन लेख मुघल व मुघालोत्तर काळातील संगीत कलेचा प्रवासावर प्रकाश टाकतो. सबंधित राजवटीमध्ये संगीत कला औरंगजेब बादशहाच्या राजवटीला अपवाद वगळून इतर सत्ताधीशांच्या काळात त्याची भरगोस प्रमाणात प्रगती झाली आहे. संगीत हे भारतीय इतिहासाचे सांस्कृतिक अंग असून त्यामधून भारताची सांस्कृतिक सभ्यता निदर्शनास येते. संगीत कलेचे मुख्य उद्दिष्ट जरी मनोरंजन असले तरी त्यातील विविध गायन, नृत्य हे प्रकार तत्कालीन समाजाची वास्तविक मांडणी करणारे प्रमुख ऐतिहासिक साधन आहे. मुघल व मुघालोत्तर काळातील संगीत कलेचा विकास व त्यास संवर्धित करण्याच्या हेतूने नेमके कोणत्या सत्ताधीशांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली यावर सदर संशोधन लेख प्रकाश टाकतो.भारतीय संगीत कलेचा इतिहास प्राचीन कालखंडापासून सुरु होवून ते आजपर्यंत सुरु आहे. मात्र प्रस्तुत संशोधन लेख केवळ मुघल व मुघालोत्तर काळातील संगीत कलेच्या इतिहासावर प्रकाश टाकतो.

**प्रस्तावना :-**

मध्ययुगीन भारताचासांस्कृतिक अभ्यासण्यासाठी विविध परंपरांना केंद्रीभूत मानून अभ्यास करणे अपरिहार्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मध्ययुगीन इतिहासाला सांस्कृतिक अंगाने स्पर्श करण्यासाठी संगीत हे अतिशय महत्त्वपूर्ण साधन आहे. मुघल सत्तेच्या स्थापनेपासून ते मुघलोत्तर काळापर्यंत भारतीय संगीत परंपरा मुस्लील परंपरेला वेगळी करून स्वतंत्रपणे अस्तित्वात येवूच शकत नाही. मध्ययुगीन भारतामध्ये मुस्लीम सत्ताधीशांच्या दीर्घकाळ सत्ता असण्याच्या कारणामुळे येथील सांस्कृतिक जीवनावर देखील प्रभाव पडलेला आढळतो. सदर प्रभाव भारतीय संगीत कलेवर देखील पडलेला आहे. मध्ययुगीन भारताची संगीत परंपरा विविध राजवटी मध्ये नेमकी कशी प्रवाहित होत जाते या विषयी सदर संशोधन लेखात मांडणी करण्यात आली आहे.

**मुघल काळातील दरबारी संगीत कला :-**

**१. बाबर :-**

मुघल सत्तेचा स्थापक बाबर यांनी अफगानिस्तान ते दिल्ली असा प्रवास करीत असताना त्यांनी भारतातील विविध बाबीचे निरक्षण करून त्यास तुझुक इ बाबरी मध्ये शब्दबद्ध केलेले आढळते. त्याला संस्कृती विषयी आस्था व संगीत व नृत्य याविषयी प्रचंड प्रेम होते. बाबर काळात भारतीय संगीत कला मंदिर संस्कृतीशी जोडली गेली होती. त्याच्या काळात संगीत, तत्वज्ञान व कीर्तन परंपरेचा विकास झाला होता. बाबर काळाशी समकालीन असणारे व कीर्तन परंपरेचे पाईक असणारे महान दक्षिण भारतातील संत चैतन्य महाराज यांनी संगीताच्या माध्यमातून कीर्तन परंपरा जपली. संत मीराबाई यांनी देखील संगीतास कीर्तन व भजन या माध्यमातून जपण्याचा प्रयत्न केला. बाबर काळात नृत्य कला बहरली होती. सुफी इस्लामिक भक्ती परंपरेमध्ये गायन आणि नृत्य या माध्यमातून देवी भक्तीसअधिक देण्यात आले होते. बाबर काळातील नृत्य परंपरा मुस्लीम आणि हिंदू अशा दोन्ही धर्माच्या प्रभावाने बहरास आली होती. मात्र दक्षिण भारतातील काही नृत्य प्रकाराने स्वतःचे अस्तित्व मुस्लीम प्रभावापासून अलिप्त ठेवले त्यामध्ये प्रामुख्याने कथ्थकली, भरतनाट्यम यांचा संदर्भ

मिळतो. बाबर हा उत्तम संगीत व कलेचा भोक्ता होता. 'दिवाण' व 'गझल' संगीत शैलींचा उहापोह प्रामुख्याने बाबर काळात पाहावयास मिळते.

**२. शेरशहा :-**

शेरशहा सुरी ची राजकीय कारकीर्द इ. स. १५४० ते १५४५ इतकीच होती. संपूर्ण कारकिर्दीत त्यास स्थैर्य प्राप्त होवू शकले नव्हते. मात्र त्यास संगीत कलेच्या विषयी प्रचंड आस्था होती. त्याने तत्कलीन काळामध्ये विविध संगीत विद्वान पंडितांना राजाश्रय बहाल केला होता. त्यामध्ये प्रामुख्याने महापात्र नरहरी, धोंडो नायक, बाबा राम दास यांचा समावेश होतो. महान इतिहासकार बदायुनी यांच्या मते सूर घराण्यातील इब्राहीम खान सूर आणि आदिल खान सूर हे महान संगीत तज्ञ व विद्वान पंडित होते. शहानवाज खान यांनी आपल्या 'Mirati-Aftubnuma Treatise' या ग्रंथामध्ये सदर बाबीचा उल्लेख केला आहे.

**३. हुमायून :-**

हुमायून हा देखील संगीत कला प्रेमी होता.परंतु त्याची कारकीर्द बहुतांशी रणांगणावर गेल्याने संगीत कलेस मोठ्या प्रमाणात न्याय देवू शकला नाही. मात्र त्यांनी संगीत कलेविषयी त्यास प्रचंड आस्था होती. त्याने त्याच्या काळातील संगीत विद्वान नायक गोपाल याचा यथोचित सन्मान केल्याचा उल्लेख मिळतो.

**४. अकबर :-**

अकबराचा काळ हा संगीत कलेच्या उत्कर्षासाठी अनुकूल काळ होता. अकबर बादशाह मुळातच धर्मसहिष्णू असल्याने त्याने संमिश्र संस्कृतीचा अवलंब केला होता. त्यामुळे विविध धर्मीय व विविध भागातील संगीत केलेच्या उपासकांना राजाश्रय देवू केला. अकबराच्या काळात विविध क्षेत्रात पारंगत असणाऱ्या '९ रत्नाचा' उल्लेख आपणास पाहावयास मिळतो. त्यापैकी गायन कलेशी निगडीत 'तानसेन' हा एक महत्वपूर्ण रत्न होते. तानसेन विषयी अबुल फझल लिहितो कि, 'भारतीय संगीतामध्ये गेल्या १००० वर्षात तानसेन इतका सुंदर गाणारा कोणी होवून गेला नसेल.' अकबराच्या काळात एकूण ३६ गायक व संगीत विद्वान पंडित राजाश्रयास होते. संगीत कलेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वाद्याच्या तंत्रज्ञानामध्ये मूलगामी बदल घडून त्याचा विकास अकबर काळात मोठ्या प्रमाणात झाला होता. विविध राग व त्यावर पर्शियन व भारतीय संगीताचा प्रभाव पडून त्यामध्ये गोडवा प्राप्त होणारा सुमधुर सूर अस्तित्वात आला. सामाजिक व धार्मिक कार्यात अकबर काळात गायन कलेस अधिक प्राधान्य दिले जात होते. परिणामी हिंदू आणि मुस्लीम धार्मिक सणामध्ये दोन्ही पंथाचे गायन होत असे. लोकमानसातील अकबराची प्रतिमा इतिहासाकारांच्या दृष्टीने जशी धर्म सहिष्णुतावादी त्याचप्रमाणे संगीत कलेच्या बाबतीत देखील तो सहिष्णूतावादी होता.

**५.रामदास :-**

अकबर काळात दरबारी गायक म्हणून रामदास होते. रामदास यांचा मुलगा सूर दास हा संगीत कलेचा उपासक, उत्तम गायक व उत्तम कवी अकबराच्या दरबारामध्ये कार्यरत होता.

**५. जहांगीर :-**

जहांगीर काळात धृपद संगीत कला प्रकाराचा मोठा प्रभाव होता. तत्कालीन काळात संगीत कलेविषयक अनेक पुस्तके लिहिले गेली त्यामध्ये 'संगीत रत्नाकर' हि त्याच्याच काळातील होय. प्रसिद्ध संगीत तज्ञ लेखक दामोदन मिश्र यांचा जन्म मिथिला मध्ये झाला असला तरी ते जहांगीर काळाशी समकालीन होते.

**६. शहाजहान :-**

शहाजहान हा कलेचा उत्तम अभ्यासक व जाणकार होता. त्याने त्याच्या दरबारामध्ये संगीत कलेस राजाश्रय बहाल केला विविध महान कवींना व संगीत विद्वानांना त्यांनी आपल्या पदरी बाळगले. शहाजहान काळात त्याच्या दरबारामध्ये प्रसिद्ध संगीत विद्वान 'जगन्नाथ' होता. त्याला त्याच्या संगीतातील विद्वत्तेपोटी 'कविराज' ही पदवी बहाल केली. तानसेन व लाल खान हे प्रसिद्ध गायक देखील त्याच्या पदरी होते. 'द स्टडी

ऑफ इंडियन म्युझिक' या पुस्तकामध्ये शहाजहान बादशहाविषयी म्हंटले आहे की, शहाजहान बादशहा हा उत्तम गायक देखील होता.

**७. औरंगजेब :-**

औरंगजेब बादशहा हा संगीत कलेचा विरोधक असल्याने त्याच्या काळात संगीत कलेवर बंदी घालण्यात आली होती. औरंगजेब बादशाहने जरी संगीत कलेकडे दुर्लक्ष केले असले तरी तो उत्तम विना वादक होता. मात्र अनेक इतिहासकारांनी औरंगजेब बादशहा विषयी लेखन करीत असताना त्याला संगीत कलेचा दुराग्रही व विनाशक म्हणून संबोधले आहे. १७ व्या शतकात त्याच्या काळात संगीत कलेची राजकीय दरबारामध्ये जरी पीछेहाट झाली असली तरी त्याच्या समकालीन काळातील इतर सत्ताधीशांच्या माध्यमातून संगीत कला जोपासली गेली होती.

**मुघालोत्तर काळातील संगीत कला :**

मुघालोत्तर काळात संगीत कलेविषयी औरंगजेब बादशहाचे धोरण दुराग्रही असले तरी त्याच्या समकालीन असणाऱ्या विविध राजवटीने संगीत कलेस राजाश्रय दिलेला आढळतो व त्याच बरोबर औरंगजेब बादशहाच्या मृत्युनंतर विविध सम्राटपदी आलेल्या बादशहानी संगीत केलेस राजाश्रय बहाल केला होता. त्यामध्ये प्रामुख्याने महम्मदशहा रंगीला, बहादूरशहा झफर व तत्कालीन काळातील समकालीन राजवटीमध्ये बिजापूर, माळवा इत्यादी स्थानिक सत्ताधीशानी संगीत कलेस राजाश्रय दिला.

**१. महम्मद शहा :-**

महम्मदशहा हा उत्तम कवी व संगीत कलेचा उपासक होता. त्याच्या दरबारात विविध संगीत तज्ञ होते. इतिहासकारांच्या मते त्याच्या दरबारात विशेषतः 'खयाल' या गायिकेच्या प्रकाराला मोठ्या प्रमाणात गायले जात होते. महम्मद शहाच्या काळापासूनच 'संगीत जलसा' प्रकाराची सुरुवात झाली. 'तापा ठुंगरी' या पंजाबी गायन प्रकाराचा विकास या काळात झाला. 'तापा' हा गायन प्रकार पंजाब मधील उंट स्वार करणाऱ्या व्यक्तीकडून गायला जात होता. महम्मद शहाच्या समकालीन असणारे महाराणा प्रताप हे देखील संगीत कलेचे जाणकार होते. त्यांच्या काळात 'राधा गोविंद संगीत सार' ही उत्तम कलाकृती अस्तित्वात आली.

**२. बहादूर शहा :-**

बहादूरशहा झफर हा उत्तम कवी व उत्तम संगीत जाणकार असणारा सम्राट होता. तो मुळातच संगीत कलेचा उपासक असल्याने त्याने राज्यातील प्रसिद्ध कवीच्या मैफिली दरबारात भारावल्या. बहादुरशाहाच्या कारकिर्दीत पर्शियन संगीत व भारतीय संगीत कलेचा मिलाफ झालेला आढळतो. त्याच्या दरबारात 'गालिब'हा उत्तम कवी व त्याच बरोबर 'रुपमती' ही प्रसिद्ध गायिका कार्यरत होती. इतिहासकारांच्या मते बहादूरशहाकडे एक उत्तम कवी असण्याचे सर्व गुण होते.

**३. आदिलशहा :-**

आदिलशहा हा मुघल साम्राज्य काळातील लोकप्रिय गायक होता. त्यांनी संगीत कलेवर आधारित विविध पुस्तकाचे लेखन केले त्यामध्ये त्याची सर्वोत्तम कलाकृती म्हणून 'Kitab-I- Nawras' याकडे पाहिले जाते. आदिलशहा हा संगीत कलेचा जाणकार व त्यावर प्रेम करणारा होता. तत्कालीन काळात त्यांनी दरबारामध्ये विविध नामवंत संगीततज्ञाच्या मैफली भरवल्या व संगीत कलेचे संवर्धन व जतन करणाऱ्या विविध संस्थाना जमिनी दान देल्या म्हणून त्यास 'जगतगुरू' म्हणून देखील ओळखले जाते.

**निष्कर्ष :-**

मध्ययुगीन काळातील संगीत कलेचा प्रवास हा संगीत कलेच्या इतिहासाचा भाग आहे. मध्ययुगीन काळातील संगीत कला हि तत्कालीन समाजाची मानसिकता, विचार आणि सामाजिक परिस्थिती याची माहिती देणारे महत्त्वपूर्ण साधन आहे. संगीत कलेच्या माध्यमातून तत्कालीन विविध ऐतिहासिक घटनाची माहिती इतिहासकारांना मिळू शकते परिणामी संगीत कला हे सामजिक इतिहासाची माहिती देणारे व

तत्कालीन सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकणारे महत्त्वपूर्ण साधन होते. मध्ययुगीन काळातील संगीतकलेस विविध राजांनी व सुलतानांनी राजाश्रय बहाल केल्यामुळे ती उत्तरोत्तर वाढत गेलेली आढळते. मात्र औरंगजेब बादशाहाने संगीत कलेला राजाश्रय दिला नाही. तो संगीत केलेचा विरोधक असला तरी तो त्याचे समूळ उच्चाटन करू शकला नाही. त्याच्या मृत्यूनंतर विविध लोकांनी संगीत कलेस राजाश्रय दिला होता त्यामुळे मध्ययुगीन काळातील संगीत कलेचा प्रवास निरंतर होवू शकला.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. Bhasham A.L., The wonder that was India, SanjitPublication, New York, 1954.

2. Burckhardt QuraishiReghal, Sufi Music of India and Pakistan, Sound Content & meaning, Cambridge University, 1986.

3. D. N. Mahajan, Modern Indian History, C. Chand & company, Ramnagar, New Delhi, 2008.

4. Das Sharma Anil, Musician of Indian Past & present, Progressive Publisher, Kolkata

5. Goswami o. The history of Indian Music in its growth and SynthesiAanaddhara, Kolkata.

6. Rosenthal Ethel, The Story of Indian Music and its Instruments Picador, India, London.

7. Swami Pranjalnanda, The Historical Study of Indian Music, Aanaddhara, Kolkata.